# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१६/०६/२०१९

## दि.१५/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २४२/१९,भादविक ३०७,३२३,५०४,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | अक्षय फाळके,वय-२१ वर्षे,रा.वडारवस्ती,कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०१९ रोजी २१/३० वा. चाटे चौक,वडारवस्ती,कर्वेनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी अनिकेत डिचोलकर याचे बहिणीचे लग्नात साऊंडचे काम केले होते, त्याचे बिलाचे पैसे बाकी होते. सदर पैशाची मागणी फिर्यादी यांनी त्याचेकडे अजय बनसोडे याचेमार्फत केली होती. त्या कारणावरून अनिकेत डिचोलकर याने फिर्यादीस ''कसले रे पैसे मागतोस? तुला आता जिवंत ठेवत नाही,तुला ठार मारतो'' असे म्हणून शिवीगाळ करून, त्याचे हातातील कोयत्याने फिर्यादीचे डोक्यात तसेच लोखंडी कोयत्याने डावे हातावर, लाकडी दांडक्याने मारून,फिर्यादीस गंभीर जखमी करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. चव्हाण ९९२२४४६१८४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २९८/१९,भादविक ३५३,२७९,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | संतोष निकम, पोलीस शिपाई, स्वारगेट वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | प्रवीण नेमीचंद मेहता,वय-४९ वर्षे,रा.अक्षय हाईटस फ्लॅट नं.१४,मुकुंदनगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०१९ रोजी २१/४५ वा. जेधे चौक पुणे-सातारा रोड स्वारगेट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जेधे चौक येथे वाहतुक नियमन करून त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना, सातारा रोडच्या डावीकडील बाजुने वाहतुकीच्या विरुध्द दिशेने येणारा यातील नमुद इसम प्रवीण नेमीचंद मेहता याने फिर्यादी यांना वाहतुकी मुळे चौक जाम झाल्याचा राग मनात धरून,फिर्यादी यांचेशी अरेरावी करुन, त्यांना अपशब्द वापरून,त्यांचे अगांवर धावुन फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला. तसेच तुम्हाला जास्त माज आला असुन, तुमची वरीष्ठ अधिका-याकडे तक्रार करतो अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा पोलीस निरीक्षक, शबनम शेख ९६८९९३४२८६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ३४४/१९,भादविक ३१८ |
| **फिर्यादी** | महादेव जठार, पो.शि. वानवडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०६/२०१९ राजी सकाळी ०६/१० वा. रामटेकडी स्मशान भुमी,वानवडी,पुणे समोरील कच-या मध्ये |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात महिलेने अनैत्तिक संबंधातुन किंवा संबंधातुन,एक पुरूष जातीचे नवजात जन्मलेले अंदाजे १ ते २ दिवसांचे एक बेशुध्द अवस्थेतील अर्भक त्याचा (मृत वा जिवंत) जन्म झाला हे लपविण्याचे व परस्पर विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने,त्यास सांभाळण्यास असमर्थता दाखवुन,त्याचे पालकत्वाची जबाबदारी न स्विकारता,त्यास जन्म देवुन,उघडयावर टाकुन निघुन गेली,म्हणुन सदर अज्ञात महिले विरूध्द गुन्हा दाखल. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्ही.बी.जगताप ७०२०८४७६१६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**